सत्यमेव जयते

# इतर मागासवर्ग कल्याण समिती

## २०१३-२०१४

**( बारावी महाराष्ट्र विधानसभा )**

**(महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद कार्यालयातील इतर मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच सदर नगरपरिषद कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल)**

# पाचवा अहवाल

**( सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी सादर करण्यात आला. )**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई

फेब्रुवारी, २०१४.

इतर मागासवर्ग कल्याण समिती

२०१३-२०१४

( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

पाचवा अहवाल

( सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी सादर करण्यात आला. )

एचबी २४४९—१

## इतर मागासवर्ग कल्याण समिती
## (२०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

(१) श्री. प्रदीप जाधव - नाईक, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.
(३) श्री. माधवराव पवार, वि.स.स.
(४) श्री. दीपक आत्राम, वि.स.स.
(५) श्री. रवि राणा, वि.स.स.
(६) श्री. के. पी. पाटील, वि.स.स.
(७) श्री. मकरंद जाधव पाटील, वि.स.स.
(८) श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स.
(९) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(१०) श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स.
(११) श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, वि.स.स.
(१२) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.
(१३) श्री. अमरिशभाई पटेल, वि.प.स.
(१४) श्री. किरण पावसकर, वि.प.स.
(१५) डॉ. रणजित पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी.
(३) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव.
(४) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव (समिती).
(५) श्री. हा. आ. देबडवार, कक्ष अधिकारी.

---

उपरोक्त समिती दिनांक २८ ऑक्टोबर, २०१३ रोजी नामनिर्देशित करण्यात आली.





## इतर मागासवर्ग कल्याण समिती
## (सन २०१२-२०१३)

**समिती प्रमुख**

(१) श्री. प्रदिप जाधव-नाईक, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. हनुमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.
(३) श्री. रमेश सिंह ठाकूर, वि.स.स.
(४) श्री. माणिकराव कोकाटे, वि.स.स.
(५) श्री. रवि राणा, वि.स.स.
(६) श्री. के. पी. पाटील, वि.स.स.
(७) श्री. मकरंद जाधव पाटील, वि.स.स.
*(८) श्री. राजकुमार बडोळे, वि.स.स.
(९) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(१०) श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, वि.स.स.
(११) श्री. संजय गावंडे, वि.स.स.
(१२) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.
(१३) श्री. अमरिशभाई पटेल, वि.प.स.
(१४) श्री. किरण पावसकर, वि.प.स.
(१५) डॉ. रणजित पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी.
(३) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव.
(४) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव (समिती).

---

उपरोक्त समिती दिनांक ६ जून, २०१२ रोजी नामनिर्देशित करण्यात आली.
*श्री. राजकुमार बडोळे, वि.स.स यांच्या ऐवजी श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स यांची दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

## इतर मागासवर्ग कल्याण समिति
## (सन २०१०-२०११)

**समिति प्रमुख**

(१) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

**समिति सदस्य**

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री. संजय देवतळे, वि.स.स.
(४) श्री. अस्लम शेख, वि.स.स.
(५) श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
(६) श्री. दिपक केसरकर, वि.स.स.
(७) श्री. गणपत गायकवाड, वि.स.स.
(८) श्री. राजकुमार बडोळे, वि.स.स.
(९) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(१०) श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, वि.स.स.
(११) श्री. संजय गावंडे, वि.स.स.
(१२) श्री. एस. क्यू. जमा, वि.प.स.
(१३) श्री. सुभाष भोईर, वि.प.स.
(१४) श्री. व्ही. यू. डायगव्हाणे, वि.प.स.
(१५) श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी.
(३) श्री. जितेंद्र भोळे, अवर सचिव.
(४) श्री. रा. रा. काठे, समिती अधिकारी.
(५) श्री. ज. य. विचारे, कक्ष अधिकारी.

---

उपरोक्त समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी नामनिर्देशित करण्यात आली.



**अनुक्रमणिका**


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (१) | **प्रस्तावना** | सात |
| (२) | **अहवाल**<br>महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद | १-७ |
| (३) | **परिशिष्ट "अ"**<br>महाबळेश्वर गिरीस्थान, नगरपरिषद कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती व तक्ते | ९-२४ |
| (४) | **परिशिष्ट " ब "**<br>समिताच्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवत्त | २५-२८ |

## प्रस्तावना

मी, इतर मागासवर्ग कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन नगरविकास विभागांतर्गत येणाऱ्या महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद कार्यालयाच्या संदर्भात समितीचा पाचवा अहवाल सभागृहाला सादर करत आहे.

इतर मागासवर्ग कल्याण समितीने महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेच्या सेवेतील इतर मागास प्रवर्गाचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच सदर प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतची माहिती घेऊन अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रश्नावलीच्या स्वरूपात विभागाकडून माहिती मागविण्यात आली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १० मे, २०१० रोजी महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद कार्यालयास भेट देऊन तेथील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. तसेच दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३ रोजी प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग व मुख्याधिकारी,महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद यांची साक्ष घेतली. समितीस प्राप्त झालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांनी दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने या अहवालात अभिप्राय व शिफारशी केल्या आहेत.

समितीने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रारूप अहवालावर विचार करून तो संमत केला.

प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग तसेच मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद यांनी समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४.

**प्रदीप जाधव-नाईक**
समिती प्रमुख,
इतर मागासवर्ग कल्याण समिती.

**अहवाल**

**महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद.**

महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद सेवेतील इतर मागासवर्गासाठी भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत तसेच महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेच्यावतीने इतर मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन त्यांचा सर्वांगीण अभ्यास करण्याचे समितीने ठरविले.

**सरळ सेवा भरती :**

त्यानुसार समितीने महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेला पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेकडुन प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, सुधारीत आकृतिबंधानुसार महाबळेश्वर नगरपरिषदेमध्ये वर्ग ३ ची ३२ व वर्ग ४ ची २८ अशी एकूण ६० पदे मंजूर असून त्यापैकी वर्ग ३ ची १८ व वर्ग ४ ची ४ अशी एकूण २२ तांत्रिक पदे आहेत तर वर्ग ३ ची १४ आणि वर्ग ४ ची ११ अशी एकूण २५ अतांत्रिक पदे मंजूर आहेत. त्यापैकी माहे मार्च २०१० अखेर वर्ग ३ व वर्ग ४ चे एकही पद भरण्यात आलेले नाही. उक्त मंजूर पदांपैकी वर्ग ४ ची सफाई कामगार १३ पदे आहेत, वर्ग ३ चे २२ पैकी इतर मागास प्रवर्गातील रोस्टर प्रमाणे ० पदे राखीव ठेवणेत आलेली आहेत. तर वर्ग ४ च्या १५ पदांपैकी रोस्टर प्रमाणे ० पदे राखीव ठेवणेत आलेली आहेत. तसेच वर्ग ३ करीता ३३ व वर्ग ४ करीता ११० अशी एकूण १४३ पदे अस्थायी मंजूर केलेली आहेत. नगरपरिषदेने तयार केलेला रोस्टर हा स्थायी पदांवरचाच तसेच राज्यस्तरीय संवर्गाची पदे सोडून तपासून दिलेला आहे.

**इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांबाबतची आरक्षणनिहाय माहिती**

| | वर्ग-३ | | | वर्ग-४ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षित | भरलेली | रिक्त | आरक्षित | भरलेली | रिक्त |
| तांत्रिक | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० |
| अतांत्रिक | ०१ | ०२ | ०० | ०० | ०२ | ०० |
| एकूण | ०१ | ०३ | ०० | ०० | ०२ | ०० |

महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १० मे, २०१० रोजी महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेस भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली. सदर चर्चेच्या वेळी समितीने महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे अशी विचारणा केली की, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक



व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती आहे, त्यापैकी माहे मार्च, २०१० अखेरपर्यंत एकूण किती पदे भरण्यात आली आहेत. उक्त मंजूर पदांपैकी वर्ग १ ते ४ मधील किती व कोणकोणती पदे इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत ? वर्ग-३ व वर्ग-४ ची तांत्रिक व अतांत्रिक पदे किती आहेत ? त्यावर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सुधारित आकृतिबंधानुसार महाबळेश्वर नगरपरिषदेमध्ये वर्ग-३ ची ३२ व वर्ग-४ ची २८ अशी एकूण ६० पदे मंजूर आहेत. तसेच वर्ग-३ ची १८ व वर्ग-४ ची ४ पदे तांत्रिक आहेत. अशाप्रकारे वर्ग-३ व वर्ग ४ ची एकूण २२ पदे तांत्रिक आहेत. वर्ग-३ ची १८ पदे तांत्रिक असून, १४ पदे अतांत्रिक आहेत. तसेच वर्ग-४ ची ४ पदे तांत्रिक असून, ११ पदे अतांत्रिक स्वरुपाची आहेत. सफाई कामगारांची १३ पदे अतांत्रिक आहेत. पुढे समितीने अशी विचारणा केली की, माहिती पुस्तिकेच्या तक्त्यात वर्ग-३ च्या तांत्रिक पदामध्ये इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे आरक्षण 'शून्य' नमूद केले आहे. परंतु १ तांत्रिक पद इतर मागासवर्ग प्रवर्गातून भरलेले असल्याचे नमूद करण्यात आले आहे याबाबत असा खुलासा करण्यात आला की, इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षण नसतानासुध्दा हे पद भरलेले आहे. वर्ग-३ मधील नगरपरिषद अभियंता हे पद एकाकी असून ते इतर मागासवर्ग प्रवर्गातून भरलेले आहे.

नगरपरिषदेचा सुधारित आराखडा २००७ मध्ये मंजूर झाला असून माहिती पुस्तिकेमध्ये ६० पदे मंजूर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही ६० पदे २००७ पूर्वीची आहेत की सुधारित आराखडा मंजूर झाल्यानंतरची आहेत, वर्ग-३ व वर्ग-४ च्या मंजूर अस्थायी पदांची संख्या किती आहे अशी समितीने पृच्छा केली असता, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सुधारित आराखड्यानुसार ६० पदे स्थायी स्वरुपाची असून, १४३ पदे अस्थायी स्वरुपाची आहेत. १४३ अस्थायी पदांना रोस्टर लागू नाही. त्यावर समितीने एकूण किती पदे रिक्त आहेत अशी विचारणा केली असता मुख्याधिकारी, यांनी वर्ग ३ व वर्ग ४ ची एकूण तांत्रिक पदे २२ असून त्यापैकी १० पदे रिक्त असल्याची माहिती दिली. वर्ग ४ मध्ये २ तर वर्ग-३ मध्ये ८ कर्मचारी आहेत इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण नाही. तथापि, ६ पदे राज्यस्तरीय संवर्गातील आहेत. वर्ग ४ मधील फायरमनची २ पदे रिक्त असून गाळणीचालक/प्रयोगशाळा सहायकाचे १ पद व सहायक ग्रंथपालाचे १ पद रिक्त असल्याची माहिती समितीला दिली.

महाबळेश्वर नगरपरिषदेमध्ये ज्यावेळी आपण पदे भरली त्यावेळी भरती प्रक्रियेची जाहिरात स्थानिक वर्तमानपत्रात दिली होती की विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रांत दिली होती अशी समितीने विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी असे नमुद केले की, भरती प्रक्रियेच्या वेळी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाते. त्यावर समितीने यापुढे केवळ स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात न देता, विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रातसुध्दा जाहिरात द्यावयास पाहिजे. जेणेकरून, इतर ठिकाणच्या

उमेदवारांना सुध्दा त्यासंदर्भात माहिती मिळून, त्यांच्याकडून अर्ज सादर करणे शक्य होईल असे नमूद केले.

नगरपरिषदेमध्ये अस्थायी पदे किती आहेत? अस्थायी पदांसाठी आरक्षण आहे का ? अशी समितीने पृच्छा केली असता, मुख्याधिकारी यांनी माहिती दिली की, नगरपरिषदेत ६० पदे स्थायी असून १४३ पदे अस्थायी आहेत. स्थायी कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर अस्थायी कर्मचाऱ्याची त्या जागी नियुक्ती केली जाते. तद्नंतर अस्थायी पद संपुष्टात येते, तसेच अस्थायी पदांसाठी आरक्षण नाही. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, स्थायी पदावर कार्यरत असणारा कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर अस्थायी कर्मचाऱ्याची त्यांच्या जागी भरती केली जाते व त्यानंतर त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळतो. याचाच अर्थ स्थायी आणि अस्थायी पदांमध्ये काहीही फरक नाही. त्यामुळे सर्वप्रथम अस्थायी पद्धत बंद झाली पाहिजे. शिवाय कंत्राटी पद्धत बंद केली पाहिजे. स्थायी कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर अस्थायी कर्मचाऱ्यांची त्या पदावर नियुक्ती केल्यामुळे एक प्रकारे इतर मागासवर्गीय उमेदवारांवर अन्याय होतो. अस्थायी पदे रद्द करुन, सर्वच पदे स्थायी करावीत. अनेक नगरपरिषदा/महानगरपालिकांच्या माध्यमातून करार पद्धतीनुसार पदे भरली जातात. अशा प्रकारे पदे भरली जात असतील तर इतर मागासवर्ग प्रवर्गातील लोकांना संधी कशी मिळेल? हा केवळ महाबळेश्वर नगरपरिषदेपुरताच मर्यादित विषय नसून, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हा प्रश्न असल्यामुळे या विषयी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

इतर मागासवर्ग कल्याण समितीने दिनांक १० मे, २०१० रोजी महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेस दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग व मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद यांची दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३ रोजी साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाबळेश्वर नगरपरिषदेमध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ ची एकूण किती पदे (तांत्रिक/अतांत्रिक पदांसह) मंजूर आहेत, त्यातील इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी संवर्गनिहाय किती पदे राखीव आहेत, त्यातील किती पदे रिक्त आहेत, रिक्त पदे भरण्यासाठी नगरपरिषदेकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच सदर रिक्त पदे किती कालावधीत भरणे अपेक्षित आहे? त्यावर महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी सांगितले की, महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचा आकृतिबंध २००६ आणि २००७ मध्ये नगरपालिका प्रशासनालय, मुंबई यांच्याकडून मंजूर झाला. त्यानुसार वर्ग-३ ची तांत्रिक पदे १८ आणि अतांत्रिक पदे १४ अशी एकूण ३२ पदे आहेत. तसेच वर्ग-४ ची तांत्रिक पदे ४ व अतांत्रिक पदे २४ अशी एकूण २८ पदे आहेत. तांत्रिक पदे २२ व अतांत्रिक ३८ अशी एकूण ६० पदे नगरपरिषदेच्या आस्थापनेवर आहेत. तसेच सर्व पदे भरलेली असून कोणतेही पद रिक्त नाही.



महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेत वर्ग ३ व वर्ग ४ ची एकूण तांत्रिक पदे २२ असून त्यापैकी १० पदे रिक्त असल्याची तसेच वर्ग ४ मधील फायरमनची २ पदे रिक्त असून गाळणीचालक, प्रयोगशाळा सहायकाचे १ पद व सहायक ग्रंथपालाचे १ पद रिक्त असल्याबाबत सांगण्यात आले होते. सदर पदे भरण्यात आली आहेत काय, तसेच सुधारित आकृतीबंधाप्रमाणे सद्य:स्थितीत इतर मागासवर्ग प्रवर्गातील किती पदे रिक्त आहेत व सदर पदे भरण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे, अशी समितीने विचारणा केली असता, महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी असे सांगितले की, वर्ग-४ मधील फायरमनची २ पदे ही राज्यस्तरीय संवर्गातील आहेत ती रिक्त आहेत. नगरपरिषद स्तरावर सदर पदांची भरती प्रक्रिया होत नाही, ती जिल्हा स्तरावर होत असते. सदरहू फायरमनची पदे भरण्याची प्रक्रिया जिल्हा स्तरावर सुरु झालेली आहे. याबाबत समितीने असे निदर्शनास आणून दिले की, समितीने १० मे, २०१० रोजी महाबळेश्वर गिरिस्थान नगरपषिदेला भेट दिली होती. या भेटीस जवळपास साडेतीन वर्षांचा कालावधी झालेला आहे. राज्य स्तरावरुन सदरहू पदे भरण्यास एवढा विलंब का होतो, अशी पृच्छा केली असता, प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, राज्यातील सर्व नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या आस्थापना आहेत, त्यांना शासनाने रिफॉर्म केले पाहिजे. त्या अनुषंगाने यासंबंधीच्या कायद्यात सुधारणा करण्यात आली. प्रत्येक नगरपरिषदेला ६ कॅटेगरीमध्ये स्टाफ असावा अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतला. या ६ कॅटेगरीमध्ये “अ”,“ब” आणि “क” असे तीन स्तर ठरविण्यात आले. “क” हा जिल्हास्तरीय स्तर आहे. “क” संवर्गातील पदे भरण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. “ब” स्तरीय स्तर आहे, ती पदे डिव्हीजन कॅडरवरील असून विभागीय आयुक्तांमार्फत भरली जाणार आहेत. “अ” संवर्गातील पदे ही राज्य स्तरीय स्तरावरुन भरली जाणार आहेत. “अ” संवर्गातील पदे डायरेक्टर, म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशन यांच्याकडून भरली जाणार आहेत. प्रथम “क” संवर्गातील पदे रिकन्साईल झाली पाहिजेत. त्यानंतर विभागीय पातळीवरील संवर्गातील पदे भरली गेली पाहिजे आणि त्यानंतर राज्यस्तरीय संवर्गातील पदे भरली गेली पाहिजेत. राज्यस्तरामध्ये काही पदोन्नतीची पदे आहेत, काही पदे सरळ सेवेने भरावयाची आहेत. “ब” संवर्गातील देखील काही पदे पदोन्नतीची आहेत, काही पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. “क” संवर्गातील पदे सरळसेवेची आहेत. त्यामुळे “क” संवर्गातील पदे भरण्याची प्रक्रिया जिल्हाधिकाऱ्यांच्या पातळीवर सुरू आहे. १३ जिल्हे सोडून इतर जिल्ह्यामध्ये बहुतांशी जिल्ह्यात ही पदे भरली गेलेली आहेत. यासंबंधी शासन पातळीवर धोरणात्मक बदल झाल्यामुळे तसेच यासंबंधीच्या कायद्यात सुधारणा करावी लागल्यामुळे ही प्रक्रिया स्ट्रीमलाईज करण्यामध्ये विलंब लागलेला आहे.

जिल्हा स्तरावरून जी पदे भरावयाची आहेत ती पदे भरण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावरून सूचना दिल्या पाहिजेत असे समितीने सूचित केले असता, प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग यांनी अशी माहिती दिली की, या बाबतीत जिल्हाधिकारी यांना दोन वेळा सूचना दिलेल्या आहेत. पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील. भरतीच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना परीक्षेची तारीख निश्चित करून दिलेली होती त्या तारखेला पदांच्या भरती संदर्भातील परीक्षा घेतल्या गेल्या पाहिजेत. या बाबतीत १३ जिल्हे वगळता सर्व जिल्ह्यांनी पदाच्या भरती संदर्भात परीक्षा घेतली आहे. १३ जिल्ह्यात काही कारणामुळे पदे भरण्यासंबंधीच्या परीक्षा होऊ शकल्या नाहीत. याबाबत पाठपुरावा करत असल्याचे समितीला सांगितले.

स्थायी पदावर कार्यरत कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या जागेवर अस्थायी पदे करार पद्धतीने भरण्याची कार्यपद्धती महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेसह सर्व महाराष्ट्रातील नगरपरिषदांमध्ये आढळून येते त्यामुळे इतर मागासवर्ग प्रवर्गातील पात्र उमेदवारांवर अन्याय होत असल्याने अस्थायी पद्धत बंद करण्याबाबत शासनाचे काय धोरण आहे? या समितीच्या प्रश्नावर प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग यांनी उत्तर दिले की, नगरपरिषदेच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर या संस्थांना आकृतिबंध तयार करून देण्यात आलेला असतो. पदे स्थायी आहे किंवा अस्थायी आहे असे काही नमूद करीत नाही. या नगरपरिषदेस आकृतिबंध ६० पदांचा मंजूर केला आहे. सदर संस्थांना पदे मंजूर करण्याचे अधिकार संचालक, म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशन यांना आहेत. राज्य सरकारला ते अधिकार नाहीत. त्यांनी या नगरपरिषदेस ६० पदे मंजूर केली आहेत. परंतु या नगरपरिषदेने २०० कर्मचारी अतिरिक्त भरून ठेवलेले होते. ६० पदांच्या बाबतीत काय करावयाचे याचा विचार त्यांच्यासमोर सुरु झाला. ६० कर्मचाऱ्यांपलिकडचे कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांना अस्थायी म्हणण्यापेक्षा अधिसंख्य असा शब्दप्रयोग त्यांनी करावयास पाहिजे होता. या ६० पदांमध्ये जी जी पदे रिक्त होतील, त्या रिक्त पदांवर या अधिसंख्य कर्मचाऱ्यांमधील जे कर्मचारी पात्र होतील, त्यांना सामावून घेतले जाईल. जे पद अधिसंख्य कर्मचाऱ्यामुळे भरले गेले तर अधिसंख्य कर्मचाऱ्यांची संख्या आपोआपच कमी होईल.

**अभिप्राय व शिफारशी :—**

समितीने महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेस दिनांक १० मे, २०१० रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेतील राज्यस्तरीय संवर्गातील जिल्हास्तरीय पातळीवरून भरावयाची काही पदे रिक्त आहेत. त्यामध्ये वर्ग-३ व वर्ग-४ मधील गाळणीचालक, प्रयोगशाळा सहायक व सहायक ग्रंथपाल व फायरमन अशी एकुण १० तांत्रिक पदे रिक्त आहेत. समितीने महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेस भेट दिल्यानंतर जवळ जवळ साडे तीन वर्षांचा कालावधी होऊनही वर्ग-४ मधील फायरमनची २ पदे रिक्त



असल्याचे विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी निदर्शनास आले. सदर पदांची भरतीप्रक्रिया नगरपरिषद स्तरावर होत नाही असे जरी असले तरी ही पदे जिल्हा स्तरावरुन भरणे आवश्यक होते. जिल्हा स्तरावरून ही पदे भरण्यास साडे तीन वर्षांचा विलंब झालेला आहे हे योग्य वाटत नाही. **सबब, जिल्हा स्तरावरुन जी रिक्त पदे भरावयाची आहेत, ती पदे तात्काळ भरण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात व भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**तसेच सदरहू रिक्त पदांची जाहिरात विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन पदे भरण्यात यावीत. याबाबत महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने सातारा जिल्हाधिका-यांकडे पाठपुरावा करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीस तात्काळ कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यातील अनेक नगरपरिषदा तसेच महानगरपालिकांमधून अस्थायी पदे करार पध्दतीने भरण्यात येत असल्याने हा प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचा असून सर्वप्रथम अस्थायी स्वरुपाची पदे भरण्याची पध्दत बंद झाली पाहिजे. महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेतही ६० पदे स्थायी असून १४३ पदे अस्थायी आहेत. स्थायी कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर अस्थायी कर्मचाऱ्याची त्या जागी नियुक्ती केली जाते. त्यानंतर त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळतो. त्यामुळे पात्र इतर मागासवर्गीय उमेदवारांवर अन्याय होतो. **अस्थायी पदे पध्दती बंद करणे किंवा सर्व अस्थायी पदे स्थायी करणे हे त्यावरील पर्याय होऊ शकतात काय याबाबत शासनाने लवकरात लवकर सर्वंकष व साधकबाधक विचार करुन संपूर्ण राज्यातील नगरपरिषदा तसेच महानगरपालिकांना बंधनकारक ठरेल असे मार्गदर्शक धोरण जाहीर करावे, अशी समितीची शिफारस आहे.**

**जात पडताळणी :—**

समितीने महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेला भेट दिली त्यावेळी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेच्या सेवेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झालेली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **ज्या कर्मचाऱ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी झालेली नाही, त्या कर्मचाऱ्यांची जात पडताळणी करुन घ्यावी अशा प्रकारच्या सूचना समितीने दिलेल्या असताना तसेच जात पडताळणी करुन घ्यावी अशा प्रकारचे शासनाचे आदेश असताना देखील महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांची जात पडताळणी अद्यापपर्यत करून घेण्यात आलेली नाही ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार ८३ कर्मचाऱ्यांपैकी ४३ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली**

असल्याचे दिसून येते. एकूण ८३ कर्मचा-यांपैकी ४३ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झाली असल्याची बाब विचारात घेता उर्वरीत ४० कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे लवकरात लवकर प्राप्त होण्यासाठी महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेने जात पडताळणी समितीकडे पाठपुरावा करावा. ज्या कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांना ठराविक मुदत देऊन जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याबाबत नोटीस देण्यात यावी. नोटीस देऊनही ठराविक मुदतीत संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांचेविरुद्ध नियमानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.





# परिशिष्ट “ अ ”

## (महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेकडून प्रश्नोत्तरे स्वरूपात प्राप्त झालेली माहिती तसेच आश्वासित माहिती व तक्ते

# महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, महाबळेश्वर

## मागासवर्ग कल्याण समिती करीताचे प्रश्नावलीची माहिती

| प्रश्न | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | नगरपरिषदेची स्थापना केव्हा झाली आहे | नगरपरिषदेची स्थापना २९ ते १८६४ रोजी झाली आहे. |
| २ | नगरपरिषदेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती आहे. त्यापैकी माहे मार्च २०१० अखेरपर्यंत एकूण किती पदे भरण्यात आली आहेत. उक्त मंजूर पदांपैकी वर्ग १ ते ४ मधील किती व कोणकोणती पदे इतर मागास वर्गातील उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. | सुधारित आकृतिबंधानुसार महाबळेश्वर नगरपरिषदेमध्ये वर्ग ३ ची ३२ व वर्ग ४ ची २८ अशी एकूण ६० पदे मंजूर असून त्यापैकी तांत्रिक वर्ग ३ ची १८ व वर्ग ४ ची ४ अशी एकूण २२ पदे आहेत तर वर्ग ३ ची १४ आणि वर्ग ४ ची ११ अशी एकूण २५ अतांत्रिक पदे मंजूर आहेत. त्यापैकी माहे मार्च २०१० अखेर वर्ग ३ व वर्ग ४ चे एकही पद गरजेत आलेले नाही. उक्त मंजूर पदांपैकी वर्ग ४ ची सफाई कामगार १३ पदे आहेत वर्ग ३ चे २२ पैकी इतर मागास प्रवर्गाची रोस्टर प्रमाणे ० पदे राखीव ठेवण्यात आलेली आहेत. तर वर्ग ४च्या १५ पदांपैकी रोस्टर प्रमाणे ० पदे राखीव ठेवण्यात आलेली आहेत. तसेच वर्ग ३ करीता ३३ व वर्ग ४ करीता ११० अशी एकूण १४३ पदे अस्थाई मंजूर केलेली आहेत. नगरपरिषदेने तयार केलेला रोस्टर हा स्थायी पदांबाबतचाच तसेच राज्य स्तरीय संवर्गाची पदे सोडून तपासून दिलेला आहे. |



# महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, महाबळेश्वर

## इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांबाबतची आरक्षणनिहाय माहिती

| | वर्ग ३ | | | वर्ग ४ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षीत | भरलेली | रिक्त | आरक्षीत | भरलेली | रिक्त |
| तांत्रिक | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० |
| अतांत्रिक | ०१ | ०२ | ०० | ०० | ०२ | ०० |
| एकूण | ०१ | ०३ | ०० | ०० | ०२ | ०० |

| | | |
|---|---|---|
| ३ | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात अलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी माहे मार्च २०१० अखेर पर्यंत एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत, तसेच सदर पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत | इतर मागास प्रवर्गाच्या उमेदवारासाठी राखीव ठेवणेत आलेल्या वर्ग ३ च्या ० पदांपैकी व वर्ग ४ च्या ० पदांपैकी एकही पद भरणेत आलेले नाही. कारण नगरपरिषदेच्या आस्थापनेस दिनांक १६ मार्च २००४, १ मार्च २००६ व २७ सप्टेंबर २००७ रोजी सुधारीत आकृतिबंध लागू केला आहे. ( सोबत जोडपत्रामध्ये माहिती दिली आहे ) |
| ४ | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यात येते, या बाबतची सविस्तर माहिती द्यावी | महाबळेश्वर नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील वर्ग ३ ची पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देवून मा. जिल्हाधिकारी सो., सातारा यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समिती कडून उमेदवारांची निवड करणेत येते तर वर्ग ४ च्या पदांवरील रिक्त पदी नियुक्ती देताना वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देवून व जिल्हा सेवा योजना कार्यालय, सातारा यांचेकडून यादी मागवून व त्यांचे उपस्थितीमध्ये मुलाखती घेऊन स्थायी समितीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करुन त्यास नेमणूक देणेची कार्यपध्दती अवलंबिण्यात येते. |
| ५ | नगरपरिषदेतील विविध पदावर उमेदवारांच्या नियुक्त्या करण्या बाबत नगरपालिकांनी सेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय, असल्यास कॅव्हा, तसेच सदर सेवा प्रवेश नियमाची प्रत समितीला द्यावी. | नगरपरिषदेस महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू आहेत. त्यामुळे नगरपरिषदेच्या विविध पदावर उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यासाठी वेगळे प्रवेश नियम तयार करणेची आवश्यकता नाही. |
| ६ | इतर मागास प्रवर्गाच्या उमेदवारासाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गेल्या तीन वर्षात सन २००७-०८ ते सन २००९-१० अखेरपर्यंत वर्षनिहाय किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तमानपत्रात पदे भरण्यासाठी जाहीराती देण्यात आल्या होत्या ( जाहिरातीच्या कात्रणाच्या झेरॉक्स प्रती नगसाक्षीच्यावेळी समितीला उपलब्ध करुन द्याव्यात ) | इतर मागास प्रवर्गाच्या उमेदवारासाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गेल्या तीन वर्षात सन २००७-०८ ते सन २००९-१० अखेरपर्यंत सुधारीत आकृतिबंध लागू केलेला असलेने व वर्ग ३ तसेच वर्ग ४ चा अनुशेष नसलेने काहीही कार्यवाही केलेली नाही. सबब माहिती निरंक आहे. |





| | | |
|---|---|---|
| ७ | उक्त जाहीरातीनुसार वर्षनिहाय इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेली कोणकोणती पदे भरण्यात आली आहेत | वरील नमूद कारणामुळे माहिती निरंक आहे. |
| ८ | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात निवड समिती स्थापन करण्यात आले आहे काय, असल्यास व निवड समितीमध्ये इतर मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे काय | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात स्पेशल निवड समिती स्थापन करण्यात आलेली नाही. मात्र मा. संचालक नगरपरिषद प्रशासन संचलनालय, मुंबई यांचे कडील स्थायी निदेश क्र. २० पत्र क्र. नप्रसंई/१००३/प्र.क. १५०/०३/७ दिनांक ३१/१२/२००३ नुसार नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत निवड समिती स्थापन करणेत आलेली आहे. त्यामध्ये इतर मागास प्रवर्गातील अधिकाऱ्याचा समावेश करणेत आलेला नाही. त्यामध्ये मा. उपविभागीय अधिकारी सो., वाई उपविभाग वाई हे अध्यक्ष तर मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद हे सचिव आणि अंतर्गत लेखा परिक्षक हे सदस्य आहेत. |
| ९ | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी १०० बिंदु नामावली ( रोस्टर ) नोंदवही ठेवण्यात आली आहे काय असल्यास केव्हापासून, तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत. | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी १०० बिंदू नामावली ( रोस्टर ) नोंदवही सन १९९४ पासून ठेवण्यात आली आहे. ती अद्ययावत स्वरुपात आहे. |
| १० | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरताना मुलाखतीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना आगाऊ कळविण्यात आले असल्यास कोणकोणत्या तारखांना व प्रत्यक्षात ते कोणकोणत्या तारखांना उपस्थित होते व नसल्यास त्याची कारणे काय आहेत. | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरताना मुलाखतीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना आगाऊ कळविण्यात येत असते मात्र सुधारीत आकृतिबंधानुसार एकही पद भरले नसलेने या कामी माहिती निरंक आहे. |

| | | |
|---|---|---|
| २१ | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांबाबत व पदे भरण्याबाबतचा अहवाल सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय ( मागासवर्ग कक्ष ) व सचिव, नगर विकास विभाग यांना पाठविण्यात आला आहे काय, असल्यास गेल्या ३ वर्षांत केव्हा केव्हा पाठविण्यात आला आहे अहवाल पाठविण्यात आला नसल्यास त्याची कारणे काय आहेत. | गेल्या तीन वर्षात सुधारीत आकृतिबंध लागू झालेमुळे स्थायी पदे रिक्त नसलेने व राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे नगरपरिषदेस भरणा येत नसलेने व वर्ग ३ ची पदे भरणेची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी सातारा यांचे कडून होत असलेने इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांबाबत व पदे भरण्याबाबतचा अहवाल पाठविणेची आवश्यकता भासलेली नाही. |
| २२ | सहाय्यक आयुक्त ( मागासवर्ग कक्ष ) यांनी नगरपरिषदेतील इतर मागासवर्गीय उमेदवारांच्या आरक्षण संदर्भात गेल्या तीन वर्षात ( सन २००७-०८ ते जुलै २००९-१० ) तपासणी केली आहे काय, असल्यास कोणकोणत्या तारखांना, तसेच आपल्या तपासणीत त्यांनी कोणत्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत व त्याची पूर्तता कशाप्रकारे करण्यात आली आहे | सहाय्यक आयुक्त ( मागासवर्ग कक्ष ) यांनी नगरपरिषदेतील इतर मागासवर्गीय उमेदवारांच्या आरक्षण संदर्भात गेल्या तीन वर्षात ( सन २००७-०८ ते जुलै २००९-१० ) या कालावधीमध्ये दिनांक २९/९/२००७ रोजी तपासणी केली आहे. त्यामध्ये राज्यस्तरीय संवर्गातील पदांची तपासणी केलेली नाही. |
| २३ | इतर मागास प्रवर्गाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी हाताळण्यासाठी नगरपालिकेमध्ये "विशेष मागासवर्ग कक्ष" स्वतंत्रित्या स्थापन करण्यात आला आहे काय असल्यास केव्हा पासून, तसेच, त्यासाठी किती अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून दिले आहेत, "विशेष मागासवर्ग कक्ष" स्थापन केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत | इतर मागास प्रवर्गाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी हाताळण्यासाठी नगरपालिकेमध्ये "विशेष मागासवर्ग कक्ष" स्वतंत्रित्या स्थापन करण्यात आला नाही. महाबळेश्वर नगरपरिषदेमध्ये आस्थापना लिपीक हे स्वतंत्र पद असलेने व त्या पदावरील कर्मचाऱ्याकडे, नेमणूक, पदोन्नती इ. सर्व कामे सोपविणेत आलेली असलेने व नगरपरिषद कर्मचारी संख्या कमी असलेने स्वतंत्र विशेष मागासवर्ग कक्ष स्थापन करणेची दक्षता घेत आहे. |
| २४ | गत ३ वर्षात सन २००७-०८ ते २००९-१० अखेर पर्यंत वर्षनिहाय इतर मागास प्रवर्गाचे अधिकारी व कर्मचारी यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील निवेदने नगरपरिषदेस प्राप्त झाली आहेत काय, असल्यास किती, तसेच त्यांचे स्वरुप काय आहे व सदर निवेदनाच्या संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली आहे | गत ३ वर्षात सन २००७-०८ ते २००९-१० अखेर पर्यंत वर्षनिहाय इतर मागास प्रवर्गाचे अधिकारी व कर्मचारी यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील निवेदने नगरपरिषदेस प्राप्त झाली नाहीत. त्यामुळे त्या संदर्भात कार्यवाही करणे बाबतची माहिती निरंक आहे. |



| | | |
|---|---|---|
| २५ | इतर मागास प्रवर्गाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी परिषदेकडून कोणकोणत्या कल्याणकारी योजना / उपक्रम राबविले जातात. | महाबळेश्वर नगरपरिषद तीचे सर्व कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाचे १० टक्के दराने गिरिस्थान भत्ता देते. तसेच दरवर्षी पावसाळ्यामध्ये प्रत्येक कर्मचाऱ्यास छत्री तसेच स्वच्छता विभागाकडील कर्मचाऱ्यांना घोंगडी दरवर्षी देते दर दोन वर्षांनी गमबूट पुरविणेत येतात. वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना शिलाईसह गणवेश पुरविणेत येतात. सफाई कर्मचाऱ्यांना नियमितपणे हातमोजे, मास्क, गमबूट इत्यादी देतात. सफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक साहित्य पुरविणेत देते. तसेच बोटक्लब विभागाकडील कर्मचाऱ्यांना दर दोन वर्षातून एकदा रेनसूट पुरविणेत येतात. मात्र इतर मागास प्रवर्गाच्या अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी खास अशी कोणतीही कल्याणकारी योजना किंवा उपक्रम राबविला जात नाही. |
| २६ | नगरपालिकेतील नैमित्तिक कामगार वर्गाची ( कॅज्युअर लेबर ) नियुक्ती करतेवेळी इतर मागास प्रवर्गाच्या विहीत टक्केवारीचे प्रमाणे धरले जाते काय नगरपालिकेत नैमित्तिक कामगार म्हणून मार्च २०१० अखेर किती कर्मचारी सध्या कार्यरत आहेत, तसेच त्यापैकी इतर मागास प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे | महाबळेश्वर नगरपरिषदेमध्ये मार्च २०१० अखेरपर्यंत एकही नैमित्तिक कामगार नसलेने सदरची माहिती निरंक आहे. |
| २७ | नगरपालिकेच्या गेल्या ३ वर्षांमधील वार्षिक अंदाजपत्रक किती रकमेचे आहे व उक्त अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण किती रक्कम इतर मागास प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी राखून ठेवण्यात आली आहे. | सन २००७-०८ चे वार्षिक अंदाजपत्रक रु. १५,०६,०५,३३८/- तर सन २००८-०९ चे वार्षिक अंदाजपत्रक रु. १३,२३,०१,५६८/- तर सन २००९-१० चे वार्षिक अंदाजपत्रक रु. १६,८८,८२,६५६/- चे होते. इतर मागास प्रवर्गासाठी कल्याणकारी योजनांवर त्यापैकी काहीही रक्कम राखून ठेवलेली नाही. |
| २८ | कर्मचाऱ्यांच्या सवलती संबंधात नगरपालिकेने इतर मागास प्रवर्गाकरीता ( सेवा व्यतिरिक्त ) त्यांचे कल्याणासंबंधात योजनेत आलेल्या अन्य उपाययोजना संबंधी तपशीलवार टिपणी द्यावी. | कर्मचाऱ्यांच्या सवलती संबंधात नगरपालिकेने इतर मागास प्रवर्गाकरीता ( सेवा व्यतिरिक्त ) त्यांचे कल्याणासंबंधात योजनेत आलेल्या अन्य उपाययोजना संबंधी कोणत्याही उपाय योजना राबविलेल्या नसल्याने माहिती निरंक आहे |

| | | |
|---|---|---|
| १३ | इतर मागास प्रवर्गांच्या उमेदवाराकरीता नगरपालिकेने काही जागा राखून ठेवल्या आहेत काय, आणि त्यांना पुढील बाबींसंबंधात काही सवलती दिल्या आहेत काय, असल्यास, त्यासंबंधीचा तपशील सादर करावा | |
| अ) | नगरपालिकेच्या मालकीच्या भाजी व अन्य बाजारामध्ये गाळ्यांचे वाटप करताना | महाबळेश्वर नगरपरिषदेने रे गार्डन, पार्सनिज मार्केट इ. इमारतीमध्ये एकूण १६६ दुकानगाळे बांधलेले असून त्यापैकी १३ दुकानगाळे सन १९९० पूर्वी लिलावाने लायसन्स धारकांना देणेत आलेले आहेत. त्यापैकी इतर मागास प्रवर्गाच्या लोकांसाठी आरक्षण ठेवणे बाबत कार्यवाही केलेली नाही. तथापी आज अखेर एकूण १३ इतर मागास प्रवर्गातील व्यक्तींनी लायसन्स पोटी १३ दुकानगाळे घेतलेले आहेत. ( सोबत यादी जोडल्या आहेत.) |
| ब) | नगरपालिकेच्या गृहनिर्माण वसाहतीमध्ये गाळ्यांचे वाटप करताना | नगरपालिका सेवक सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये ९ इतर मागास प्रवर्गातील व्यक्तींना प्लॉट वाटप झालेले आहे. (सोबत यादी जोडल्या आहेत.) |
| क) | व्यवसाय व व्यापारासाठी दीर्घकालीन भाड्याने प्लॉटस् देताना | व्यवसाय व व्यापारासाठी दीर्घकालीन भाड्याने प्लॉटस् दिलेले नसलेने माहिती निरंक आहे |
| ड) | बाजारपेठांमध्ये रस्त्यावर गाळ्यांकरीता परवाने देताना | बाजारपेठांमध्ये व रस्त्यांवर उमेदवारांना गाळ्यांकरीता परवाने दिलेले नाहीत. |
| | | |

मुख्याधिकारी,
महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद,
महाबळेश्वर



## महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद

### नगरपरिषदेच्या विविध मार्केट मधील इतर मागासवर्गीय गाळेधारकांची यादी

| | |
|---|---|
| १ | गोपाळ दत्तात्रय भुतकर |
| २ | रघुनाथ दत्तात्रय भुतकर |
| ३ | उषा उत्तम वाईकर |
| ४ | दिलीप गजानन शिपटे |
| ५ | चंद्रकांत राजाराम राक्षे |
| ६ | काशिनाथ तुकाराम सुकाळे |
| ७ | किशोर दिगंबर शिंत्रे |
| ८ | अमोद वसंत गोंदकर |
| ९ | एकनाथ शंकर गायकवाड |
| १० | सुनिता सुर्यकांत जगताप |
| ११ | अनिल पंडीत यादव |
| १२ | मनोज मारुती जाधव |
| १३ | डॉ. एस. पी. जंगम |

## महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद

### नगरपालिका गृहनिर्माण सोसायटीमधीला इतर मागासवर्गीय प्लॉटधारकांची यादी

१ जाधव ए. व्ही

२ कदम एल. बी.

३ केंडे के. बी.

४ कांदळकर बी. एस.

५ उगले एस. बी.

६ काटेकर एम. एम

७ पोरे आर. एन.

८ पोतदार एस. आर.

९ क्षीरसागर व्ही. जी.



## म..बळेश्वर गिरिस्थान नगरपा ..द, महाबळेश्वर

नगरपालिकेच्या सेवेमधील भरती पध्दतीने भरलेल्या इमार मागासवर्गीय कर्मचा-यांनी मार्च २०१०, अखेरपर्यंतची सद्य:स्थिती, बिंदू नामावलीनुसार शिल्लक असलेल्या अनुशेषाची माहिती व रिक्त पदे दर्शविणारे विवरणपत्र

**तांत्रिक पदे**

| अ.नं. | पदाचे नांव | वर्ग | वेतनश्रेणी | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | इतर मागास प्रवर्गासाठी टककेवारीनुसार आरक्षीत पदे | प्रत्यक्षात असलेल्या इतर मागासवर्गीय कर्मचा-यांची संख्या | अनुशेष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | नगरपरिषद अभियंता | ३ | ९३००-३४८०० | १ | १ | ० | --- | १ | --- | राज्यस्तरीय |
| २ | स्वच्छता निरिक्षक | ३ | ५२००-२०२०० | १ | १ | ० | --- | --- | --- | --- |
| ३ | विद्युत पर्यवेक्षक | ३ | ५२००-२०२०० | १ | ० | १ | --- | --- | --- | राज्यस्तरीय |
| ४ | सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक | ३ | ५२००-२०२०० | १ | १ | ० | --- | --- | --- | --- |
| ५ | सहाय्यक ग्रंथपाल | ३ | ५२००-२०२०० | १ | ० | १ | --- | --- | --- | --- |
| ६ | वीजतंत्री/ पंपचालक/जोडारी | ३ | ५२००-२०२०० | २ | २ | ० | --- | --- | --- | --- |
| ७ | गाळणी चालक/प्रयोगशाळा सहा | ३ | ५२००-२०२०० | २ | १ | १ | --- | --- | --- | --- |
| ८ | वाहन चालक | ३ | ५२००-२०२०० | २ | २ | ० | --- | --- | --- | --- |
| ९ | फायरमन | ४ | ४४४०-७४४० | ४ | २ | २ | --- | --- | --- | --- |
| १० | वाहन चालक कम् ऑपरेटर | ३ | ५२००-२०२०० | २ | २ | --- | --- | --- | --- | --- |
| ११ | सहा.अग्निशामक पर्यवेक्षक | ३ | ५२००-२०२०० | १ | --- | १ | --- | --- | --- | राज्यस्तरीय |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | लिडींग फायरमन | ३ | ५२००-२०२०० | १ | -- | १ | --- | — | — | — |
| १३ | संगणक अभियंता | ३ | ५२००-२०२०० | १ | -- | १ | --- | --- | — | राज्यस्तरीय |
| १४ | कनिष्ठ पाणी पुरवठा पर्यवेक्षक | ३ | ५२००-२०२०० | १ | -- | १ | --- | --- | --- | राज्यस्तरीय |
| १५ | कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक | ३ | ५२००-२०२०० | १ | -- | १ | --- | --- | --- | राज्यस्तरीय |
| | एकूण | | | २२ | १२ | १० | --- | १ | --- | ---- |

मुख्याधिकारी,
महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद,
महाबळेश्वर



# महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, महाबळेश्वर

नगरपालिकेच्या सेवेमधील भरती पध्दतीने भरलेल्या इमार मागासवर्गीय कर्मचा-यांनी मार्च २०१०, अखेरपर्यनतची सद्य:स्थिती, बिंदू नामावलीनुसार शिल्लक असलेल्या अनुशेषाची माहिती व रिक्त पदे दर्शविणारे विवरणपत्र

**अतांत्रिक पदे**

| अ.नं. | पदाचे नांव | वर्ग | वेतनश्रेणी | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | इतर मागास प्रवर्गा साठी टककेवारी नुसार आरक्षीत पदे | प्रत्यक्षात असलेल्या इतर मागासवर्गीय कर्मचा-यांची संख्या | अनुशेष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सहा. कार्यालय निरिक्षक / सहा. कर निरिक्षक | ३ | ५२००-२०२०० | २ | १ | १ | ० | ० | ० | राज्यस्तरीय |
| २ | वरिष्ठ लिपीक | ३ | ५२००-२०२०० | २ | २ | ० | ० | ० | ० | |
| ३ | लिपीक/ टंकलेखक | ३ | ५२००-२०२०० | ८ | ८ | ० | १ | २ | ० | |
| ४ | सहा. लेखापाल/ सहा. लेखा परिक्षक | ३ | ५२००-२०२०० | २ | ० | २ | ० | ० | ० | राज्यस्तरीय |
| ५ | नाईक, मुकादम | ४ | ४४४०-७४४० | ३ | ३ | ० | ० | ० | ० | |
| ६ | शिपाई | ४ | ४४४०-७४४० | ७ | ७ | ० | ० | २ | ० | |
| ७ | व्हॉलमन | ४ | ४४४०-७४४० | १ | १ | ० | ० | ० | ० | |
| | एकूण | | | २५ | २२ | ३ | १ | ४ | ० | |

मुख्याधिकारी,
महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद,
महाबळेश्वर

# महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, महाबळेश्वर

जि. सातारा, पिनकोड नं. ४१२ ८०६

मु. अ. कार्यालय : २६०२२०
फॅक्स : २६०३३२

मुख्याधिकारी कार्यालय : २६०६०३
मुख्याधिकारी निवास : २६०६०१


क्र. वि. नं. ७६/४०४

दिनांक : २८/१०/२०१३

प्रति,
मा. अवर सचिव सो.,
महाराष्ट्र विधानमंडळ,
विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन,
विधान भवन मार्ग,
मुंबई ४०० ०३२

विषय :- महाराष्ट्र विधानमंडळाच्या इतर मागासवर्ग कल्याण समितीने दि. १०/५/२०१० रोजी महाबळेश्वर नगरपरिषद येथे दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला आश्वासित केलेली माहिती पाठविण्याबाबत कार्यवृतांतामध्ये विचारणेत आलेल्या प्रश्नांबाबत

संदर्भ :- आपला दिनांक २५/१०/२०१३ रोजीचा दूरध्वनी संदेश

महोदय,

उपरोक्त नमूद विषयाचे संदर्भिय दूरध्वनीस अनुसरुन कळविणेत येते की, महाबळेश्वर येथे दिनांक १०/५/२०१० रोजी महाराष्ट्र विधानमंडळाच्या इतर मागावर्ग कल्याण समितीच्या भेटीच्या वेळीच्या कार्यवृतांतामध्ये विचारणेत आलेल्या प्रश्नांबाबतची या नगरपरिषदेची माहिती सोबत जोडून सादर करीत आहे. कळावे.

आपला विश्वासू,

मुख्य अधिकारी,
महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद,
महाबळेश्वर



## महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, महाबळेश्वर

इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या दिनांक १० मे २०१० रोजी महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद येथे झालेल्या जिल्हा बैठकीतील आश्वासित माहिती

| अ. क्र. | कार्यवृत्ताचे पृष्ठ क्रमांक | समितीने विचारलेला प्रश्न आणि देणेत आलेले आश्वासन | आश्वासना नुसार नगरपरिषद यांनी केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | B-१ | २ | मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष हे सफाई कामगारांची पदे तपासत नसलेने त्यांचा उल्लेख नगरपरिषदेच्या माहितीमध्ये सफाई कर्मचारी वगळून असा करणेत आलेला आहे. त्यामुळे नगरपरिषदेने सादर केलेली माहिती बरोबर आहे. आणि त्या बाबत बैठक संपणेपूर्वी सविस्तर स्वरुपात दाखविणेत आलेली आहे. |
| | B-२ | २ | इतर मागासवर्गीय दोन पदे भरली आहेत त्या बाबतची माहिती मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष पुणे यांना या कार्यालयाचे पत्र व.शी.नं. १६/१९३ दिनांक ८/६/२०१० रोजी सादर केली आहे. |
| | C-१ | २ | इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या दिनांक १० मे २०१० रोजी महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद येथे झालेल्या जिल्हा बैठकीची असुधारीत यादी या कार्यालयास प्राप्त झाली असून सदर बैठकीचे इतिवृत्तामध्ये करावयाच्या बदलांबाबत या कार्यालयाचे पत्र व.शी.नं. १६/३२८ दिनांक २६/७/२०१० रोजी कळविणेत आलेले आहे. |
| | C-२ | ४ | नगरपरिषदेने सुधारीत आकृतिबंध लागू झालेपासून म्हणजे २००७ पासून आकृतिबंधानुसार आरक्षण नमूद करणेस आणि त्यानुसार सदरची पदे भरणे बाबत दक्षता घेतलेली आहे. |
| | D-२ | ६ | भविष्यात नगरपरिषदेमध्ये भरती करणेचे वेळी फक्त स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात न देता विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात देखील जाहीरात देणेची दक्षता घेणेत येत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | D-२ | २१ | इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांबाबत व भरण्याबाबतचा अहवाल यापूढे मा. जिल्हाधिकारी सो., सातारा यांचे बरोबरच मा. सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय ( मागासवर्ग कक्ष ) व मा. सचिव नगर विकास विभाग यांना पाठविणेची कार्यवाही करणेची दक्षता घेणेत येत आहे. |
| | E-१ | १३ | मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्र. नपप्रसं/कक्ष-४/अज-अजा-आयोग/सुचना/२०१० दिनांक २८/७/२०११ नुसार नगरपरिषद कर्मचाऱ्यांची संख्या ५०० पेक्षा कमी असलेने आणि सर्वच कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी हाताळण्यासाठी नगरपरिषदेमध्ये स्वतंत्र अस्थापना लिपीक हे पद असलेने स्वतंत्र विशेष मागासवर्ग कक्ष स्थापन करणेची आवश्यकता नाही |
| | F-१ व F-२ | १९ | महाबळेश्वर नगरपरिषदेने तीचे शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक यांना रोस्टर तपासणी बाबत नगरपरिषद आदेश व.शी.नं. १६/४७९ दिनांक १७/१०/२०१३ अन्वये कळविलेले असून त्यानुसार प्रशासनाधिकारी व मुख्याध्यापक त्यांचे म्हणणे साक्षीचे वेळी इतर मागासवर्ग समितीला सादर करणार आहेत. |

मुख्य अधिकारी,
महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद,
महाबळेश्वर

# परिशिष्ट “ ब ”

## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त



**पहिली बैठक**

**दिनांक १० मे, २०१०**

इतर मागासवर्ग कल्याण समितीची बैठक दिनांक १० मे, २०१० रोजी महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, महाबळेश्वर येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख.**

(१) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.

(३) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.

(४) श्री. राजकुमार बडोळे, वि.स.स.

(५) श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, वि.स.स.

(६) श्री. संजय गावंडे, वि.स.स.

(७) श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, वि.प.स.

(८) श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. आर.आर.काठे, अवर सचिव (समिती).

(२) श्री. ज.य.विचारे, कक्ष अधिकारी.

**आयुक्त कार्यालय (मागासवर्ग कक्ष), पुणे.**

श्रीमती राणी ताटे, सहायक आयुक्त

**महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, महाबळेश्वर :-**

(१) श्री. एस. पी. वाघमारे, मुख्याधिकारी, नगरपरिषद महाबळेश्वर.

(२) श्री. बी. ए. सोळंकी, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सातारा.

(३) श्री. एस. एम. काटेकर, अभियंता, नगरपरिषद महाबळेश्वर.

(४) आर. एम. कुरेशी, स्वच्छता निरीक्षक, नगरपरिषद महाबळेश्वर.

(५) श्री. एस. एस. शिंदे, कार्यालय अधिक्षक, वि.जि.स.क.अ.सातारा.

(६) श्री. एस. डी. कारंडे, प्रशासन अधिकारी, नगरपालिका पाचगणी/महाबळेश्वर.

(७) श्री. बी.आर.बागलकोटी, मुख्याध्यापक, गिरिस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर.

सदरहू बैठकीत समितीने महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, महाबळेश्वर, जि.सातारा या नगरपरिषदेतील अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली.

**दुसरी बैठक**

**दिनांक २६ नोव्हेंबर,२०१३.**

इतर मागासवर्ग कल्याण समितीची बैठक दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३ रोजी विधानभवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. प्रदीप जाधव-नाईक, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. दीपक आत्राम, वि.स.स.

(३) श्री. रवि राणा, वि.स.स.

(४) श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, वि.स.स.

(५) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव.

(२) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव (समिती)

**नगरविकास विभाग :-**

श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२)

**महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद**

श्री.सचिन पवार, मुख्याधिकारी.

सदरहू बैठकीत इतर मागासवर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषदेमार्फत इतर मागासवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

**आयुक्त कार्यालय (मागासवर्ग कक्ष), पुणे विभाग**

श्रीमती वर्षा लड्डा (उंटवाला), सहा. आयुक्त



**तिसरी बैठक**

**दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४.**

इतर मागासवर्ग कल्याण समितीची बैठक दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री.प्रदीप जाधव - नाईक, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.

(३) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(४) श्री. मकरंद जाधव पाटील, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी.

(२) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव.

(३) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव (समिती)

सदरहू बैठकीत समितीने प्रारुप अहवालावर विचार केला व किरकोळ दुरुस्त्यांसह तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई